जिल्हाधिकारी कार्यालय यवतमाळ
सिव्हील लाईन यवतमाळ

(दुसरी वेळ)

दरपत्रक सूचनापत्र

अनु.क्र. :-

---

क्रमांक/जिल्हा नाझर/कावि 429 /२०२१ दिनांक :- 18 /१०/२०२१

**संदर्भ :- १) मा.जिल्हाधिकारी यवतमाळ यांचे टिपणी मंजुर दिनांक २९/९/२०२१**
**२) या विभागाचे दरपत्रक सूचनापत्र क्रमांक/जिल्हा नाझर/कावि४११/२०२१ दिनांक ०५.१०.२०२१**

जिल्हाधिकारी कार्यालय यवतमाळ, जिल्हा कार्यालय परिसर, गार्डनमधील अल्युमिनीयम, प्लॉस्टीक, लोखंड, तांबे मिक्स असलेली छत्री विकत घेणा-या इच्छुक खरेदीदारांकडुन बंद पाकीटामध्ये दरपत्रके मागविण्यात येत आहे. दरपत्रक मागविणेकरीता १) दरपत्रकाचे सुचनापत्र २) अटी व शर्ती ३) फॉर्म क्रमांक -१ (तांत्रिक कागदपत्रे),फॉर्म क्रमांक -- २ (दर तपशिल) प्रसिध्दीकरणेकरीता अ) www.yavatmal.nic.in जिल्हा संकेतस्थळ ब) जिल्हा नाझर बोर्ड क) तहसिल कार्यालय यवतमाळ या ठिकाणी प्रसिध्द करण्यात येत आहे.

| अनु. क्र. | कामाचे स्वरूप | विक्री करावयाच्या वस्तु ची अंदाजीत किंमत | सुरक्षा ठेव रूपये | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी कार्यालय यवतमाळ, जिल्हा कार्यालय परिसर, गार्डनमधील अल्युमिनीयम, प्लॉस्टीक, लोखंड तांबे मिक्स असलेली छत्री विक्री करणे. | रूपये ५,००,०००/- अंदाजीत | रूपये १५,०००/- (पंधरा हजार) अधिक्षक, जिल्हाधिकारी कार्यालय यवतमाळ यांचे नावे धनादेश /डीमांड डॉफट (DD/Cheque) | दर मंजुरी पासुन आठ (शासकीय कामाचे दिवस) |

**फॉर्म मिळण्याचे ठिकाण** :- www.yavatmal.nic.in यवतमाळ जिल्हा संकेतस्थळ, जिल्हा नाझर विभाग,जिल्हाधिकारी कार्यालय व तहसिल कार्यालय यवतमाळ.

**छत्री विक्री करणेकरीता दरपत्रक मागविण्याच्या प्रक्रियेचे वेळापत्रक खालील प्रमाणे राहील.**

| अनु.क्र. | विवरण | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | दरपत्रक प्रसिध्दीचा दिनांक | 18 /१०/२०२१ | सकाळी ११.०० वाजता |
| २ | दरपत्रक भरण्याचा दिनांक | 18 /१०/२०२१ | सकाळी ११.०० वाजता |
| ३ | दरपत्रक भरण्याचा अंतीम दिनांक | 26 /१०/२०२१ | सांयकाळी ०५.०० वाजेपर्यंत |
| ४ | दरपत्रक उघडण्याचा दिनांक व वेळ | 26 /१०/२०२१ | दुपारी ०५.३० वाजता. उघडयाचे ठिकाण :- अधिक्षक, जिल्हाधिकारी कार्यालय यवतमाळ यांचे दालनात. |

**सूचना :- (अ) तांत्रिक लिफाफा मध्ये खालील कागदपत्रे मुळ व छायाप्रत जोडावी.**

१) छत्री विकत घेण्यास इच्छुक खरेदीदारांनी वरील वेळापत्रकानुसार एक कागदावर पुर्ण नाव, पत्ता, दुरध्वनी क्रमांक/भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी लिहुन जोडावा.
२) खरेदीदारांनी पॅन कार्ड, आधारकार्ड छायाप्रत जोडावी.
३) महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम २०१७ अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र छायाप्रत जोडावी
४) सुरक्षा ठेव रूपये १५,०००/- अधिक्षक जिल्हाधिकारी कार्यालय यवमताळ यांचे नावे धनादेश/डिमांड ड्राफ्ट.(मुळ)

**(ब) दराचा लिफाफा क्रमांक - २.**
**दरपत्रक फॉर्म क्रमांक -- २ (दर तपशिल)**

(प्र.कि.दुबे)
**अपर जिल्हाधिकारी, यवतमाळ**

दिनांक :- 18 /१०/२०२१
ठिकाण :- यवतमाळ
**प्रतिलीपी :- माहीती व आवश्यक कार्यवाही करीता**

१) जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी यवतमाळ यांना, जिल्हा संकेतस्थळावर प्रसिध्दी करीता.
२) तहसिलदार यवतमाळ यांनी, सदरची नोटीस, नोटीस बोर्ड वर प्रसिध्दी करून प्रसिध्दी अहवाल सादर करावा.
३) जिल्हा नाझर, जि.का.यवतमाळ यांनी, सदरची नोटीस, नोटीस बोर्ड वर प्रसिध्दी करून प्रसिध्दी अहवाल सादर करावा.

सदर जाहिरनाम्याची प्रत जिल्हाधिकारी कार्यालयाचे नोटीस बोर्डवर लावून प्रसिध्द करण्यात आली आहे.
दिनांक. 18/10/2021
जिल्हा नाझिर 18/10/2021
जिल्हाधिकारी कार्यालय यवतमाळ

(प्र.कि.दुबे)
अपर जिल्हाधिकारी, यवतमाळ

## दरपत्रकाच्या शर्ती व अटी

१) इच्छुक खरेदीदारांनी तांत्रिक लिफाफ्यासोबत जोडलेले दस्तवेजाच्या छायाप्रती स्पष्ट दिसतील अशा जोडाव्यात. व स्वसांक्षाकीत करणे बंधनकारक राहील. तसेच फॉर्म क्रमांक- १. व फॉर्म क्रमांक- २. ही दोन्ही पाकीटे एका वेगळया तिस-या पाकीटात बंद करून त्यावर आपला नाव , पत्ता व **छत्रीचे दरपत्रक** असा मजकुर लिहुन सिलबंद पेटीत टाकणे बंधकारक राहील.

२) तांत्रिक लिफाफ्यासोबत जोडलेले दस्तवेजाच्या छायाप्रती छाननी केल्यानंतर व त्या पात्र असल्याचे खात्री झाल्यावर वाणिज्य (दर) लिफाफा उघडण्यात येईल. तांत्रिक कागदपत्र अपुर्ण असतील तर वाणिज्य (दराचा) लिफाफा उघण्यात येणार नाही.अशी तांत्रिक लिफाफे दप्तर दाखल करण्यात येतील

३) यशस्वी खरेदीधारकाने दरपत्रक मंजुरी पासुन आठ दिवसाचे आत (कामाचे दिवस) छत्री खोलुन त्याचे वजन समिती समक्ष करावे लागेल. खरेदी केलेल्या छत्रीच्या वजनाची रक्कम चालानव्दारे बॅकेत भरणा करावा लागेल.

४) छत्री काढणे व घेवुन जाणेकरीता कोणताही रिक्षा भाडे /हमाली या कार्यालयाकडुन अदा करण्यात येणार नाही.

५) छत्री विक्री करणेकरीता, कोणतेही कारण न देता रद् करण्याचे अधिकार तसेच शर्ती व अटी मध्ये बदल करण्याचे अधिकार या कार्यालयाचे राहतील.

६) दरपत्रक मंजुरीनंतर यशस्वी खरेदीधारकाने (अंजाचे कामाची किंमत रूपये ५,००,०००/-) चे रूपये १५,०००/- (अक्षरी- पंधरा हजार) सुरक्षा ठेव अधिक्षक, जिल्हाधिकारी कार्यालय यवतमाळ यांचे नावे धनादेशाव्दारे जमा ठेवावी लागेल.

७) कोणतेही कारण न देता दरपत्रकातील दर्शविलेले दर मान्य किंवा अमान्य करण्याचे पुर्ण अधिकार या कार्यालयास राहतील.

८) दरपत्रक संदर्भात कोणताही वाद निर्माण झाल्यास त्यावर निर्णय घेण्याचा अधिकार या कार्यालयास राहील व तो अंतीम निर्णय असेल.

९) यशस्वी खरेदीधारकाने दरपत्रक मंजुरीनंतर आठ (शासकीय कामाचे दिवस) दिवसात छत्री काढुन, घेवुन न गेल्यास जास्त विलंब केल्यास दरपत्रक आपोआप रद् समजण्यात येईल.

(प्र.कि.दुबे)
**अपर जिल्हाधिकारी, यवतमाळ**

**दरपत्रकाचा फॉर्म क्रमांक -- १ (कागदपत्राचा पाकीट)**

जिल्हाधिकारी कार्यालय यवतमाळ, जिल्हा कार्यालय परिसर, गार्डनमधील अल्युमिनीयम, प्लॉस्टीक, लोखंड मिक्स असलेली छत्री विकत घेणेकरीता दरपत्रकाच्या सूचनेनुसार खालील प्रमाणे तांत्रिक बाबींचा माहीती स्वसाक्षांकीत करून सोबत जोडण्यात येत आहे.

| अनु क्र. | तपशिल | कागदपत्रे सोबत जोडली आहे/नाही |
|---|---|---|
| १ | दरपत्रक धारकाचे पुर्ण नाव, पत्ता,दुरध्वनी,भ्रमणध्वनी क्रमांक ई-मेल आयडी | |
| २ | महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम २०१७ अंतर्गत प्रमाणपत्र (स्वसाक्षांकीत छायाप्रत) | |
| ३ | पॅन कार्ड, आधारकार्ड छायाप्रत जोडावी. | |
| ४ | सुरक्षा ठेव रक्कम रूपये १५,०००/- अधिक्षक जिल्हाधिकारी कार्यालय यवमताळ यांचे नावे धनादेश/डिमांड ड्राफ्ट. | |

**छत्री खरेदीधारकाची स्वाक्षरी-----------------------**

**दिनांक :-**

**खरेदी धारकाचे नाव---------------------------**

**ठिकाण :-**

**फर्म चे नाव व पत्ता ---------------------------**